Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- X | ISSUE- VII | JULY | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x

# हैदराबाद मुक्तीलढा आणि रजाकार

**डॉ. ओमशिवा लिगाडे**
शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय नळेगाव
जि. लातूर

**पार्श्वभूमी**

*15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. धर्माधारीत मुस्लिम बहुल प्रांत भारतापासून वेगळा होऊन त्यातून पाकिस्तानची निर्मिती झाली. तर उर्वरित हिंदू बहुल प्रांत हे भारतात विलीन होत होते. हैदराबाद आणि काश्मीर सारखे काही संस्थान मात्र विलिनिकनास विरोध करीत होते. हैदराबाद संस्थानावर तब्बल सहा पिढ्यांपासून निझाम वंशाचे राज्य होते.1 तत्पूर्वीच इ.स. 1929 मध्ये हैदराबाद संस्थान मधील एक सेवानिवृत्त अधिकारी 'मोहम्मद नवाझ खान' यांनी संस्थानातील मुस्लिम समाजाच्या हितासाठी मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन संघटनेची स्थापना केली.2 लवकरच एम आय एम मुस्लिम समाजात प्रसिद्धीस आली. त्यात रझाकरांची मोठ्या प्रमाणात भरती सुरू झाली. या संघटनेचे नेतृत्व अलिगढ मुस्लिम विद्यापीठतुन शिकून आलेल्या कासीम रझवी कडे दिल्या गेले. कासीम रझवी हा मुस्लिम राष्ट्रवादाचा कट्टर पुरस्कर्ता होता.*

**रझाकरचा अर्थ**

रझाकर हा एक अरबी शब्द आहे ज्याचा शाब्दिक अर्थ 'स्वयंसेवक' असा आहे. हा शब्द उर्दू भाषेत सुद्धा वापरला जातो. दुसरीकडे बांगलादेशात, रझाकार हा शब्द हीन भावनेतून वापरला जातो, तेथे ज्याचा अर्थ 'देशद्रोही' किंवा यहूदा असा होतो. हैदराबादचा शेवटचा आणि सातवा निझाम मीर उस्मान अली खान याने हैदराबाद संस्थान भारतात विलीन होण्यापासून वाचवण्यासाठी कासीम रझवीच्या नेतृत्वाखाली एक क्रूर अर्धसैनिक दल स्थापन केले होते. पद्धतशीर हिंदू विरोधी हिंसाचार हे या दलाचे उद्दीष्ट होते. या दलास त्यावेळेस रझाकार असे संबोधले जात असे. हैदराबादच्या या रझाकार दलाने तेथील बहुसंख्यांक हिंदूंवर अत्याचार करताना क्रौर्याची परिसीमा गाठली होती. अत्याचाराची तुलना क्रूरकर्मा हिटलरच्या नाझी सैन्याशी केली जाते. त्यामुळे आजही मराठवाडा आणि तेलंगणात या शब्दाकडे शिवी या भावनेने पाहिल्या जाते.[3]

**हैदराबाद मुक्तीलढयातील रझाकराचे अत्याचार**

निजामाकडे नियमित लष्कर तर होतंच. पण त्याबरोबरच इत्तेहादचे रझाकार आणि सामान्य जनतेवर अत्याचार करण्यासाठी रोहिलेदेखील आणले गेले होते. निजामाच्या लष्करात 42,000 सैनिक तर 25,000 रोहिले बाहेरच्या राज्यातून आणले.[4] हैदराबाद संस्थानानं रझाकार नावाची लष्करी संघटना उभारली होती. तिचा प्रमुख होता कासिम रिझवी. त्याला साथ मिळाली ती बहादूर यार जंग यांची, जे 'मजलिस-ए-इत्तेहादूल मुसलमीन' या पक्षाचे अध्यक्ष होते.

आपण 'मुसलमान' आहोत, म्हणजे शासक असून दुसऱ्यावर अधिसत्ता गाजवण्यासाठीच आपला जन्म झालाय असे जे तत्त्वज्ञान (अनल मलिक या अर्थाचे) बहादूर यार जंग यांनी मांडले होते ते संस्थानातील प्रशासनात आणण्यासाठी कासिम रिझवी यांनी सर्व ते केलं.[6]

**निजामाच्या इस्लामिक राज्यात**

हिंदूंचा धार्मिक छळ झाला. हिंदूंचे इस्लाममध्ये जबरदस्तीने धर्मांतर केले. रझाकार हे ब्रिटिश राजवटीत हैदराबाद राज्यातील मुस्लिम राष्ट्रवादी मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लीमीन पक्षाचे कासिम रझवी यांच्या नेतृत्वात निमलष्करी स्वयंसेवक दल होते. बहुसंख्य-हिंदू समुदायाच्या उठावाच्या भीतीने, निजामाने कासिम रझवी यांच्या नेतृत्वाखालील रझाकारांच्या निर्मितीला मंजुरी दिली. ते हैदराबादमध्ये मुस्लिम राजवट टिकवून ठेवण्यासाठी आणि भारतात एकीकरणास विरोध करण्यासाठी तैनात करण्यात आले होते. रझाकारांनी हिंदूंचा धार्मिक छळ केला. तेलंगणातील वीरा

बैरनपल्ली या गावात पुरुषांनी गोळ्या घालून ठार मारून हिंदू महिलांवर निर्दयीपणे बलात्कार केले. खून, बलात्कार, लुटालूट यांनी परिसीमा गाठली होती.[5] या दहशतीपासून वाचण्यासाठी अनेक गावकऱ्यांनी शेतातील मोकळ्या विहिरीत उड्या घेतल्या. हिंदूंचा धार्मिक छळ करतांना अनेक मंदिरेही रझाकारांनी लुटली. रझाकारांनी 1948 मध्ये ऑपरेशन पोलोद्वारे त्यांच्या सैन्याचा पराभव होईपर्यंत त्यांची हिंदू विरोधी धार्मिक अत्याचारांची रानटी मोहीम सुरू ठेवली होती. लवकरच निझाम सरकारला आणि एम आय एमच्या कारवायांना कंटाळून सर्वधर्मीय जनतेने भारतात विलीन होण्याची मागणी सुरू केली. रझाकरांनी अत्यंत क्रौर्याने ही चळवळ मोडण्यास सुरुवात केली.[6]

संस्थानात मुस्लीम अल्पसंख्य असले तरी बहुसंख्याकांना डावललं जात होतं, उर्दूची सक्ती, निझामाची प्रार्थना सक्ती, अन्य भाषांचा कोणताही कार्यक्रम किंवा प्रयत्न उधळून लावणे, बिगर मुस्लिमांवर कर लादणे, भारतीय स्वातंत्र्य लढ्याला संस्थानात शिरकाव करू न देणे असले जुलमी प्रकार रिझवी आणि त्यांचे रझाकार करायचे. लुटालूट, बलात्कार, पळवापळवी हे नित्याचं त्याने करून टाकलं होतं. त्यावेळच्या काही अहवालामध्ये सारी आकडेवारी उपलब्ध आहे. त्यानुसार 45 ते 48 या काळात बायका पळवून नेण्याची आणि बलात्कार झाल्याची नोंद आहे.7 भारताच्या मध्यभागी "पाकिस्तान" निर्माण करावं, अशी रिझवी, इत्तेहाद आणि बहादूर यार जंग यांचे मनसुबे होते आणि निझाम त्याला अनुकूल होता.

निझामाला जिन्ना यांच्या पाकिस्तानात रस नव्हता. आपण जनतेवर शासन करण्यासाठीच जन्माला आलो अशी त्याची धारणा होती. निजामाने स्वतःचे कायदे, स्वतःचं चलन, स्वतःचं प्रसार माध्यम, स्वतःचं लष्कर प्रारंभापासूनच उभारले होते. हे इथं समजून घ्यायला हवे की त्यावेळी देशभरात काँग्रेस मार्फत चळवळ चालू होती, पण संस्थानात स्टेट काँग्रेसला बंदी होती. निझामाचे आतंरराष्ट्रीय संबंध चांगले होते शिवाय तो अति गर्भश्रीमंत असल्यानं स्वातंत्र्य चळवळीतील काही नेत्यामध्ये त्याला हाताळण्यात संभ्रम होता.

शेवटी भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निझाम सरकारच्या विरोधात 'पोलीस ऍक्शन'ची घोषणा केली. ऑपरेशन पोलो अंतर्गत मेजर जनरल जे. एन. चौधरीच्या नेतृत्वाखाली पाच दिशेने निझाम संस्थानावर कारवाई सुरू झाली. भारतीय फौजेपुढे रझाकार फार वेळ टिकू शकले नाहीत आणि कासीम राजवीला अटक झाली. शेवटी 18 सप्टेंबर 1948 रोजी निझाम सरकारने हार मानली. चारमिनारवारील आसफजही झेंडा उतरवून तिरंगा फडकवण्यात आला.8 आणि हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. कासीम रजवीला आजीवन कारावास तर एम आय एम आणि रझाकरांवर कायमस्वरूपाची बंदी घालण्यात आली. इ.स. 1957 मध्ये तत्कालीन सरकारने एम आय एम वरील बंदी हटवली आणि एम आय एमचे रूपांतरण ए आय एम आय एम म्हणजेच ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन मध्ये करण्यात आले. लवकरच कासीम रझवीला केवळ एका अटीवर सोडण्यात आले की तो 48 तासात भारत सोडून पाकिस्तान मध्ये जाईल.

## निष्कर्ष

1. रझाकारांनी मुक्ती लढ्या दरम्यान हिंदूंचा अनन्वित छळ केल्याचे दिसून येते.
2. मीर उस्मान अली हा निजाम रझाकरांची मदत घेऊन हैदराबाद स्वतंत्र राज्य निर्माण करण्याच्या प्रयत्न करीत होता.
3. रझाकार संघटनेचे नेतृत्व कासिम रिझवी याच्याकडे आल्यापासून अत्याचारात वाढ झाल्याचे दिसून येते.
4. रझाकार हे क्रूर अर्धसैनिक दल असून पद्धतशीर हिंदूविरोधी हिंसाचार हे या दलाचे उद्दिष्ट दिसून येते.
5. हैदराबाद मुक्ती लढ्यादरम्यान रजाकारांचे सर्व मनसुबे भारत सरकार आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यसैनिकांनी उधळून लावले.

## संदर्भ

1. Srinath, Raghavan (2010). War and peace in modern India. Houndmills, Basingstoke, Hampshire: Palgrave Macmillan. p. 75
2. प्राचार्य डॉ. रोडे सोमनाथ, 2008, हैदराबाद मुक्ती लढा आणि स्वामी रामानंद तीर्थ, अश्विनी प्रकाशन, लातूर, पृ. 55.
3. What does razakar mean? (definitions.net) Dated 05.06.2023

4. https://www.bbc.com/marathi/india-45535638 Dated 05.06.2023
5. उमाटे भाऊसाहेब शिवाजीराव, 2022, शौऱ्यगाथा हैदराबाद मुक्तिसंग्रामाची, वेदश्री प्रकाशन, लातूर, पृ. 26.
6. Daily The Hindu, 22 August 2008
7. https://www.bbc.com/marathi/india-45535638 Dated 05.06.2023
8. प्राचार्य डॉ. रोडे सोमनाथ, पूर्वोक्त, पृ. 63.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com